# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 27 March 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २७ मार्च २०२५ दुपारी १.०० वा.**

****

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था – डीआरडीओ आणि भारतीय नौदलाने जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या कमी पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. ओडिशातल्या चांदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रावरुन काल ही चाचणी करण्यात आली. या चाचणीने क्षेपणास्त्र प्रणालीची सीमेजवळ–कमी उंचीवर मारा करण्याची क्षमता स्थापित केली. या चाचणी दरम्यान, क्षेपणास्त्राने कमी उंचीवर चपळता, विश्वासार्हता आणि अचूकता दाखवून लक्ष्य पूर्णपणे नष्ट केलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल डीआरडीओ आणि नौदलाचं अभिनंदन केलं आहे.

****

मुंबई पोलिसांनी अवैधरित्या राहणाऱ्या १७ बांग्लादेशी नागरीकांना अटक केली. यामध्ये चार पुरुष, पाच महिला आणि आठ तृतीयपंथीयांचा समावेश आहे. या सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये प्रवाशांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे यंदाही जादा वाहतूक करण्यात येणार आहे. त्यासाठी उन्हाळी जादा वाहतूकीसाठी दररोज लांब पल्ल्याच्या ७६४ फेऱ्यांचं नियोजन करण्यात आलं असून, या सर्व फेऱ्या आगाऊ आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत ही जादा वाहतूक केली जाणार असून, प्रवाशांना महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे.

****

मतदार याद्यांचं निरंतर अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया आणि प्रत्येक मतदान केंद्राकरता राजकीय पक्षांकडून मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नियुक्ती यासंदर्भात राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस.चोक्कलिंगम यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची काल बैठक झाली. यासंदर्भात सविस्तर चर्चा करुन सर्व राजकीय पक्षांच्या सूचनांची नोंद घेऊन त्या अनुषंगाने कायद्यातल्या तरतूदी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येईल, असं चोक्कलिंगम यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या ऊसतोड कामगारांच्या आरोग्यविषयक समस्यांचं प्रभावी निराकरण करण्यासाठी स्वतंत्र कृती दल स्थापन करण्याचे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. बीड जिल्ह्यातल्या ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया प्रकरणी गठीत समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागाने केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या काल बोलत होत्या.

****

पंढरपूर इथल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या सर्व प्रकारच्या पूजांसाठी ऑनलाईन पद्धतीनं सोय श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. एक एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीतील पुजांसाठी पंचवीस तारखेला एका दिवसातच नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. यामधून सुमारे ७१ लाख रुपये देणगी मिळाली आहे.

****

जागतिक रंगभूमी दिन आज साजरा होत आहे. १९६१ मध्ये ‘युनेस्को’च्या इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिटयूटने या दिवसाची सुरुवात केली. पहिला जागतिक रंगभूमी दिन १९६२ मध्ये साजरा झाला. त्यानंतर दरवर्षी या दिवशी विविध कार्यक्रम आणि उपक्रमांद्वारे हा दिन उत्साहाने साजरा होतो.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी ३० तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२०वा भाग असेल.

****

विवाहपूर्व समुपदेशनासाठी देशातल्या ११ राज्यांमध्ये आतापर्यंत २३ केंद्र उभारण्यात आल्याची माहिती, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली. अशी समुपदेशन केंद्र सरकारी कार्यालयांमध्ये उघडण्यात येतील, त्यांचावर जिल्हा प्रशासन किंवा पालिकांची देखरेख राहील. विवाहासंबंधी सामाजिक मानसशास्त्र आणि वर्तनाचे पैलू यांच्याविषयी विवाह - इच्छुक मुलामुलींना समुपदेशन या केंद्रात देण्यात येईल. संयुक्त कुटुंब पद्धती लयाला जात लहान कुटुंब निर्माण होत आहेत, त्यामुळे वैवाहिक तंटे, घटस्फोट, अपयशी विवाहांची प्रकरणं वाढत असल्याचंही रहाटकर यांनी सांगितलं.

****

शासनाच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि धाराशिव जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने धाराशिव ग्रंथोत्सव नुकताच पार पडला. या ग्रंथोत्सवात 'धाराशिव जिल्ह्याचा प्राचीन इतिहास' या विषयावरच्या परिसंवादात ज्येष्ठ साहित्यिक आणि इतिहास आणि पुरातत्त्व संशोधक युवराज नळे यांनी मार्गदर्शन केलं. जिल्ह्यातला प्राचीन वारसा जतन करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

नवी दिल्लीत सुरु असलेल्या खेलो इंडिया पॅरा क्रीडा स्पर्धेचा आज समारोप होत आहे. केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे या समारोप सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राने १५ सुवर्णांसह एकूण ३७ पदकांची कमाई करत पाचवं स्थान पटकावलं आहे. यामध्ये १३ रौप्य आणि नऊ कांस्य पदकांचा समावेश आहे. हरियाणा पहिल्या, तामिळनाडू दुसऱ्या, उत्तर प्रदेश तिसऱ्या तर राजस्थान चौथ्या स्थानावर आहे.

दरम्यान, या स्पर्धेत काल भारोत्तोलन प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि एका कांस्य पदकाची कमाई केली. नेमबाजीत स्वरूप उन्हाळकर आणि सागर कटाळेनं सुवर्णपदकं जिंकली.

****